# प्रेसनोट

दि. ०२/०८/२०२३

विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस उपनिरीक्षकावर
लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. शंकर धोंडीबा कुंभारे, वय ४३ वर्ष, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक – विश्रामबाग पो.स्टे. पुणे शहर. (वर्ग-२) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये (पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १५,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २१/०७/२०२३ व दि. २८/०७/२०२३ |
| सापळा दिनांक | ०२/०८/२०२३ |

ठिकाण :- संभाजी पोलीस चौकीत.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचेविरुद्धच्या तक्रारी अर्जाची चौकशी लोकसेवक शंकर कुंभारे, पोलीस उपनिरीक्षक हे करीत होते. सदर तक्रारी अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांचेविरुद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी लोकसेवक शंकर कुभारे यानी ५०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक शंकर कुभारे यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, तडजोडीअंती ३०,०००/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन, त्यापैकी १५,०००/- रुपये स्विकारल्यावर त्याना रंगेहाथ पकडण्यात आले असून, विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.